ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - XI Issue - II April - June - 2022

MARATHI

Peer Reviewed Refereed
and UGC Listed Journal

Journal No. 40776

IMPACT FACTOR / INDEXING
2020 - 6.306
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖
Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

The information and views expressed and the research content published in this journal, the sole responsibility lies entirely with the author(s) and does not reflect the official opinion of the Editorial Board, Advisory Committee and the Editor in Chief of the Journal **"AJANTA"**.
Owner, printer & publisher Vinay S. Hatole has printed this journal at Ajanta Computer and Printers, Jaisingpura, University Gate, Aurangabad, also Published the same at Aurangabad.

**Printed by**

Ajanta Computer, Near University Gate, Jaisingpura, Aurangabad. (M.S.)
**Printed by**

Ajanta Computer, Near University Gate, Jaisingpura, Aurangabad. (M.S.)
Cell No. : 9579260877, 9822620877, Ph. No. : (0240) 2400877

E-mail : ajanta6060@gmail.com, www.ajantaprakashan.com

**AJANTA - ISSN 2277 - 5730 - Impact Factor - 6.306 (www.sjifactor.com)**

# EDITORIAL BOARD

**Professor Kaiser Haq**
Dept. of English, University of Dhaka,
Dhaka 1000, Bangladesh.

**Roderick McCulloch**
University of the Sunshine Coast,
Locked Bag 4, Maroochydore DC,
Queensland, 4558 Australia.

**Dr. Ashaf Fetoh Eata**
College of Art's and Science
Salmau Bin Adbul Aziz University. KAS

**Dr. Nicholas Loannides**
Senior Lecturer & Cisco Networking Academy Instructor,
Faculty of Computing, North Campus,
London Metropolitan University, 166-220 Holloway Road,
London, N7 8DB, UK.

**Muhammad Mezbah-ul-Islam**
Ph.D. (NEHU, India) Assot. Prof. Dept. of
Information Science and Library Management
University of Dhaka, Dhaka - 1000, Bangladesh.

**Dr. Meenu Maheshwari**
Assit. Prof. & Former Head Dept.
of Commerce & Management
University of Kota, Kota.

**Dr. S. Sampath**
Prof. of Statistics University of Madras
Chennari 600005.

**Dr. D. H. Malini Srinivasa Rao**
M.B.A., Ph.D., FDP (IIMA)
Assit. Prof. Dept. of Management
Pondicherry University
Karaikal - 609605.

**Dr. S. K. Omanwar**
Professor and Head, Physics,
Sat Gadge Baba Amravati
University, Amravati.

**Dr. Rana Pratap Singh**
Professor & Dean, School for Environmental
Sciences, Dr. Babasaheb Bhimrao Ambedkar
University Raebareily Road, Lucknow.

**Dr. Shekhar Gungurwar**
Hindi Dept. Vasantrao Naik
Mahavidyalaya Vasarni, Nanded.

**Memon Sohel Md Yusuf**
Dept. of Commerece, Nirzwa College
of Technology, Nizwa Oman.

**Dr. S. Karunanidhi**
Professor & Head,
Dept. of Psychology,
University of Madras.

**Prof. Joyanta Borbora**
Head Dept. of Sociology,
University, Dibrugarh.

**Dr. Walmik Sarwade**
HOD Dept. of Commerce
Dr. Babasaheb Ambedkar Marathwada
University, Aurangabad.

**Dr. Manoj Dixit**
Professor and Head,
Department of Public Administration Director,
Institute of Tourism Studies,
Lucknow University, Lucknow.

**Prof. P. T. Srinivasan**
Professor and Head,
Dept. of Management Studies,
University of Madras, Chennai.

**Dr. P. Vitthal**
School of Language and Literature
Marathi Dept. Swami Ramanand
Teerth Marathwada University, Nanded.

# EDITORIAL BOARD

**Dr. Jagdish R. Baheti**
H.O.D. S. N. J. B. College of Pharmacy,
Meminagar, A/P. Tal Chandwad, Dist. Nashik.

**Dr. Sadique Razaque**
Univ. Department of Psychology,
Vinoba Bhave University,
Hazaribagh, Jharkhand.

**Prof. Ram Nandan Singh**
Dept. of Buddhist Studies University of Jammu.

**Dr. Safiqur Rahman**
Assistant Professor, Dept. of Geography,
Guwahati College Bamunimaidam, Guwahati,
Assam.

**Dr. Vilas A. Gaikwad**
Chief Editor, HOD, Public Administration
M.S.Gote College Wahim

**Dr. G. Kubade**
Principal
M.S.Gote College Wahim

**Dr. Prachi Patharkar**
IQAC Coordinator
M.S.Gote College Wahim

**Dr. Vedprakash Dongaonkar**
Chairman ,Research Committee
M.S. Gote College, Washim

**Dr. V. B. Chandajkar**
HOD,Political Science
M.S. Gote College, Washim

**Dr. Priti Pohekar**
HOD, Public Administration
Rajarshi Shahu Mahavidhyalya (Autonomous)

**Dr. Bheem Rao Jhade**
Asst.Prof. of Public
Administration, Principal, Government
Degree College,Nirmal Telegana

**PUBLISHED BY**

**Ajanta Prakashan**
Aurangabad. (M.S.)

# CONTENTS OF MARATHI PART - I


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे परराष्ट्र धोरण व अंतर्गत सुरक्षा विषयक धोरण<br>**प्रा. डॉ. कदम संतोष तुकाराम** | १-५ |
| २ | मोदींचे परराष्ट्र धोरण : सातत्य की स्थित्यंतर?<br>**डॉ. उज्ज्वला यशवंत सामंत** | ६-१२ |
| ३ | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे परराष्ट्रीय धोरणविषयक विचार<br>**प्रा. कांबळे के. जे.** | १३-१६ |
| ४ | पंतप्रधान नरेंद्र मोदीच्या परराष्ट्र धोरणाचा चिकित्सक अभ्यास<br>**डॉ. विकास बी. चांदजकर** | १७-२१ |
| ५ | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे परराष्ट्रीय धोरण विषयक दृष्टीकोन<br>**डॉ. प्रमोदकुमार केशव नंदेश्वर** | २२-२७ |
| ६ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे परराष्ट्र धोरण विषयक विचार<br>**रविकिरण बसंतराव सदानशिव** | २८-३३ |
| ७ | भारतीय परराष्ट्र धोरणावर नवीन आर्थिक धोरणाचा झालेला परिणाम<br>**डॉ. सुरेश बळीराम गजभारे** | ३४-३७ |
| ८ | मोदींचे परराष्ट्र धोरण बद्दल किंवा सातत्य<br>**प्रा. सुरेन्द्र हरिभाऊ किन्हीकर** | ३८-४२ |
| ९ | भारत-चीन संबंध : चीनचे विस्तारवादी धोरण आणि त्याचे भारतावरील परिणाम<br>**प्रा. डॉ. सुधिर नारायणराव देशमुख** | ४३-४४ |
| १० | कोविड १९ नंतरची भारतातील मानसिक आरोग्य आणि औद्योगिक स्थिती<br>**प्रा. डॉ. गणेश वायकोस** | ४५-४९ |
| ११ | भारताच्या परराष्ट्र धोरणाची वाटचाल आणि आव्हाने<br>**प्रा. डॉ. प्रिया भा. बोचे** | ५०-५५ |
| १२ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे परराष्ट्र धोरणावरील विचार<br>**डॉ. मुट्ठे पी. आर.**<br>**कदम आर. बी.** | ५६-५९ |

VOLUME - XI, ISSUE - II - APRIL - JUNE - 2022
**AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.306 (www.sjifactor.com)** **CC-16**

# ११. भारताच्या परराष्ट्र धोरणाची वाटचाल आणि आव्हाने

**प्रा. डॉ. प्रिया भा. बोचे**
संत भगवानबाबा कला महाविद्यालय, सिंदखेड राजा.

सारांश

भारताच्या परराष्ट्र धोरणाला **स्वातंत्र्य**आंदोलनाच्या काळापासूनच एक निश्चित पूर्वपिठीका प्राप्त आहे. विदेश निती आणि इतिहास याचा घनिष्ठ संबंध असतो, शांतता, मैत्री, विश्वशांती, हा विचार महात्मा बुध्द व महात्मा गांधी सारख्यांनी मांडला जो वारसा रूपाने भारताच्या परराष्ट्र धोरणात समाविष्ठ झाला. त्याचप्रमाणे साम्राज्यवाद, वंशभेद याची झळ भारताला सोसावी लागली म्हणूनच भारतीय परराष्ट्र धोरणाच्या नीतीमध्ये साम्राज्यवाद, वंशभेद,वसाहतवाद, उच्चाटन करणारे उद्दीष्ट सामाविष्ट आहे. दुस-या महायुध्दानंतर भांडवलशाही व साम्यवादी गटात जगाची विभागणी झाली तेव्हा भारताने दोन्ही गटापासून अलिप्त राहण्याची निती स्विकारली. ब्रिटीशांच्या पिळवणूकीमुळे राजकीय स्थैर्याबरोबरच आर्थिक विकास वेगवान पध्दतीने व्हावा अशी गरज भारतीय नेत्यांना वाटणे स्वाभाविक होते. शांतता टिकविण्याकरीता युध्दाचा धिक्कार करणे ही भूमिका परराष्ट्र धोरणाला आधारभूत ठरेल हे कॉंग्रेसचे वेळोवेळी संमत केलेल्या ठरावांवरून दिसून येते. राष्ट्रीय कॉंग्रेसच्या स्थापनेपासून तिने आंतरराष्ट्रीय प्रश्नात लक्ष घातले होते. 1927 च्या मद्रास अधिवेशनातील परराष्ट्रीय धोरण विषयक ठराव वर्तमान, धोरणाचा पूर्वनिर्दकच होय. 1936 पासून कॉंग्रेसने परराष्ट्रीय विभाग उघडला होता. म्हणूनच **स्वातंत्र्यो**त्तर भारताचे परराष्ट्र धोरण **स्वातंत्र्य**पूर्वकाळातील राष्ट्रीय महासभेने ठरविलेल्या तत्वावर आधारलेले आहे, असे म्हणता येते.

मुख्य शब्दः परराष्ट्र धोरण, राजनय, अलिप्ततावाद, अण्वस्त्र परिक्षण, युनो

**प्रस्तावना**

भारताचे परराष्ट्र धोरण 1947 नंतर अस्तीत्वात आले असे समजण्याचे कारण नाही. कारण कौटील्यांच्या काळापासूनच याचे अस्तित्व दिसून येते. भारतीय संस्कृतीच्या प्राचीन तत्वांनी भारताचे परराष्ट्र धोरण समृध्द केले आहे. भारतीय **स्वातंत्र्य** चळवळीने भारताच्या परराष्ट्र धोरणाची पायाभरणी केली होती. तशा प्रकारचे अनेक ठराव 1885 पासून स्थापन झालेल्या राष्ट्रीय महासभेने घेण्यास सुरूवात केली होती. तसेच आंतरराष्ट्रीय संबंधातही लक्ष दिले. साम्राज्य विरोधी आंदोलने, स्पेनचे गृहयुध्द, चीनवरील जपानचे आक्रमण, हूकूमशाही, वर्णभेद, जागतीक शांतता इ.बाबत राष्ट्रीय विभागच उघडला होता. महात्मा गांधीजी, पंडीत जवाहरलाल नेहरून यांची विचारसरणी व व्यक्तीमत्त्वाचा फार मोठा प्रभाव भारताच्या परराष्ट्र धारणावर पडला होता. 1946 मध्ये अंतरीम शासन अस्तीत्वात आल्यानंतर पंडीत जवाहरलाल नहरूंनी नभोवाणीवर केलेल्या भाषणात भारतीय परराष्ट्र धोरणाची तत्वे विशद केली होती.

भारतीय परराष्ट्र धोरणाची मुलभूत तत्वे भारतीय संविधानात कलम 51 मध्ये सुध्दा नमुद आहेत. दुस-या महायुध्दानंतर भारत, युगोस्लाव्हिया, इजिप्त यांनी अलिप्तवादी राष्ट्राचा एक गट निर्माण केला.त्यातून पंचशिल तत्वे अस्तीत्वात आली. परंतु भारत पाक संबंध सतत तणावपूर्ण राहीले आहेत. आशिया खंडाचे नेतृत्व करण्याची मनिषा भारताची असली तरी शेजारील राष्ट्रांसोबत कायम सलोख्याचे संबंध निर्माण करण्यास भारत अजुनही पाहीजे त्या प्रमाणात यशस्वी झाला नाही यावरून त्यात काही उणिवा वसमस्या निश्चितच विद्यमान आहे, हे दिसून येते.

**भारताच्या परराष्ट्रीय धोरणांची वाटचाल**

भारताचे परराष्ट्र धोरण विविध कालखंडात कसे विकसित झाले हे पाहणे महत्वाचे ठरते. **स्वातंत्र्य**पूर्व कालखंड ते 1947 हा पहिला टप्पा होय. **स्वातंत्र्य** आंदोलनामध्ये राष्ट्रीय कॉंग्रेसच्या स्थापनेपासून तर 1947 पर्यंत भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसचे वर्चस्व असलेली विदेशनीती असे याचे स्वरूप होते. राष्ट्रीय कॉंग्रेसने ब्रिटीशाच्या धोरणावर टिका करायला सुरूवात केली होती, वसाहतवादाला विरोध व हूकूमशाही राजवटीवर भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसने टिका केली होती. बंडवादाला विरोध, शलाल स्पर्धेला विरोध, शांततामय सहअस्तीत्व अशा आदर्शवादी व मूल्यनिर्धारिष्ट वैचारिकतेतून व भारताच्या ऐतिहासिक वारसातून व प्रभावातून भारताच्या परराष्ट्र धोरणांची तत्वे निर्माण होण्यास मदत झाली व परराष्ट्र निती विषयक मत मांडण्यात तत्कालीन कालखंडास सुरूवात झाली. यामध्ये प्रामुख्याने 1931 चे जपानचे मंचुरीया वरील आक्रमण, याला राष्ट्रीय कॉंग्रेसने विरोध केला. 1935 चे इटलीचे इथियोपीवरील आजुमन 1937 चे जपानचे चिनवर आक्रमण, 1938 चे जर्मनीचे झेकोस्लावाकीया वरील आक्रमण 1939 चे जर्मनीचे ऑस्ट्रीया व पोलंड वरील आक्रमनाला भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसने विरोध केला त्याचप्रमाणे संयुक्त राष्ट्र संघात इंडोनेशीया, मोरक्को, साईप्रस, अल्जीरीया, लिबिया, यांच्या **स्वातंत्र्य** आंदोलनाचे समर्थन केले. यावरून हे स्पष्ट होते की,**स्वातंत्र्य** भारताचे परराष्ट्र धोरणाचा पायाभरणी **स्वातंत्र्य**पूर्व काळात झाली.

**पंडित जवाहरलाल नेहरूंच्या काळातील विदेश निती**

भारताच्या परराष्ट्र धोरणाचे शिल्पकार म्हणून पं. नेहरूंना ओळखले जाते. भारताचे नवीन परराष्ट्र धोरण निर्मितीत त्यांचा फार मोठा वाटा आहे. त्यांना आंतरराष्ट्रीय प्रश्न व समस्यांची उत्तम जाण होती. या काळातील नेहरूंची निती आदर्शवादी तत्वावर आधारलेली होती. पंडीत नेहरूंच्या परराष्ट्र धोरणात सर्वसमावेशक सुरक्षा योजना, आर्थिक विकास, मानवी सुरक्षा, बाह्य सुरक्षेसोबतच अंतर्गत सुरक्षेला त्यांनी महत्व दिले. सामान्य मानसाचा दैनंदीन गरजा पूर्तीकडे त्यांचे लक्ष होते. लोकशाही, धर्मनिरपेक्षता, बहूलताबाद असलेल्या राष्ट्रासोबत संबंध विकसित करण्यावर भर होता. संपूर्ण आशिया खंडाच्या राजकारणातून भारताच्या परराष्ट्र नितीचा त्यांनी विचार केला. आशिया, आफ्रिका, लॅटीन अमेरिका, वसाहतवाद, वंशवाद याला विरोध लष्करी संघटना व धृविकरणाला विरोध, आंतरराष्ट्रीय न्यायाला महत्व हे या कालखडातील परराष्ट्र धोरणाची मुख्य तत्वे होती. तसेच ह्याच काळात भारताने असंलग्नतेचे व

आंतरराष्ट्रीय प्रश्नांवर स्वतंत्रपणे आपल्या वैचारिकतेनुसार मन मोडण्याचे धोरण स्विकारले म्हणूनच 1950 मध्ये उत्तर कोरीयाला आक्रमक ठरविल्याच्या बाजुने युरोमध्ये मतदान केले. भारत चीन संबंधामुळे असंलग्नता नितिवर ताण पडल्यामुळे संरक्षण व्यवस्थेकडे अधीक लक्ष देण्याची भारताला गरज वाटली.

लाल बहादूर शास्त्रीच्या काळात भारतीय विदेश नितीत वेगळा बदल झाला. 1965 मध्ये पाकीस्तानने भारतावर आक्रमण केले. यात भारताचे जशास तसे उत्तर दिले. यातही भारताने शांती प्रस्ताव करून आंतरराष्ट्रीय स्तरावर आपली वेगळी ओळख निर्माण केली.

लाल बहादूर शास्त्री नंतर इंदिरा गांधीनी 1971 च्या भारत-पाक युध्दात मोठे यश मिळविले. याच काळात भारताचे सोवियत संघासोबत घनिष्ठ संबंध निर्माण झाले. 1974 मध्ये भारताने पोखरणमध्ये अणुपरिक्षण केले, परंतु अण्वस्त्राचा विकास केला नाही या काळात आर्थिक व सैनिकी आत्मनिर्भरतेवर भर देण्यात आला. शेजारी राष्ट्रासोबत घनिष्ठ संबंध, चीन सोबत तणाव कमी करण्याचे प्रयत्न व्यावहारिक असतांना वादावर भर देण्यात आला.

मोरारजी देसाईच्या काळात राष्ट्रीय सहमतीच्या विदेश नीतीचा कालखंड होय. विदेश मंत्री अटल बिहारी वाजपेयी यांनी सातत्या व बदल या सोबतच राष्ट्रीय सहमतीला प्रमुख स्थान दिले आणि प्रचलित विदेश नीतीत फारसा बदल केला नाही. यानंतर पुन्हा इंदीरा गांधीच्या काळात विदेश नीतीत बदल दिसून येते. 1980 मध्ये रशीयाने अफगाणीस्थानमध्ये हस्तक्षेप केला. यावर भारताने रशियाचे नांव न घेता विरोध दर्शविला. तसेच अमेरिका व रशिया द्वारा हिंदी महासागरात केलेला नौसैनिक शक्ती प्रदर्शनाला तिव्र विरोध केला. 1982 पासून ह्या क्षेत्राला संकटाचे क्षेत्र असे म्हणायला सुरूवात केली. याच काळात अमेरिका, पाक, चीन सोबत चांगले संबंध प्रस्तापित करण्यावर भर देण्यात आला.

राजीव गांधीच्या काळात भारतीय परराष्ट्र नितीला व्यावहारीक रूप देण्याचा प्रयत्न केला. विश्वनाथ प्रतापसिंहच्या काळात खाडीयुध्द झाले, या वेळेस कोणत्याही पक्षाला साथ न देण्याची नीती अंमलात आली तथा पाकीस्तान संबंध सुधारण्यावर भर देण्यात आला. पंतप्रधान चंद्रशेखर पंतप्रधान झाले. त्यांच्या काळात इराक-कुवेत युध्दात इराकची निंदा करून खाडी युध्दाच्या वेळेस अमेरिकेवर विमानांचा भारतात इंधन भरण्याची सुविधा उपलब्ध करून दिली. या नंतरच्या काळात भारताच्या परराष्ट्र धोरणात बदल झाल्याचे दिसून येते. यात पंतप्रधान पी.व्हि. नरसिंहराव यांनी केला. भारतीय अर्थव्यस्था मुक्त झाली. या काळात परराष्ट्र धोरणाचा वापर आर्थिक हितसंबंध जोपासण्याकरीता करण्यावर भर दिल.राजकीय हितसंबंधापेक्षा आर्थिक हितसंबंधाला महत्व प्राप्त करून दिले. विचार सरणीपेक्षा हितसंबंधाला स्थान प्राप्त झाले. परराष्ट्र धोरणात व्यावसायीकता येवून भांडवलशाहीकडे झुकले. भारताच्या पूर्वेकडील राष्ट्राशी संबंध प्रस्तापित करण्यावर भर दिला, कारण ती राष्ट्रे व्यापाराच्या दृष्टीने महत्वाची होती. त्यानंतर पंतप्रधान इंद्रकुमार गुजराल यांच्या काळात परराष्ट्र धोरणाचे सैध्दान्तिकरण करण्याचा प्रयत्न झाला. भारताच्या शेजारी राष्ट्रासोबत संबंध विकसित करण्यावर भर दिला. भारत-पाक संबंध

सुधारण्याबाबत विशेष प्रयत्न केले, त्यातुन सांस्कृतिक शैक्षणिक व व्यापार विषयक संबंधावर भर देण्यात आला. काश्मिर प्रश्न सोडविण्याकरीता प्रयत्न केले. भारताला युनोमध्ये कायम सदस्यत्व मिळविण्याकरीता प्रयत्न केले. गल्फ राष्ट्र युरोपियन युनियन सोबत व्यापार वाढविण्यावर भर दिला.

पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या काळात भारताचे परराष्ट्र धोरण वास्तववादी बनविण्याचा प्रयत्न करण्यात आला. याच वेळेस सदभावनेवर आधारित नितीला सुरूवात झाली. सर्व शेजारी राष्ट्रासोबत सलोख्याचे संबंध निर्मितीवर भर देण्यात आला. याच काळात भारत अण्वस्त्रधारी देश म्हणून निर्माण झाला. अमेरिकेसोबत जवळीक व घनिष्ठ संबंधावर भर दिला. सामरिक युती करण्याचा प्रयत्न केला तसेच युनोच्या कायम सदस्य राष्ट्रासोबत संबंध दृढ करण्यावर भर दिल्या, अण्वस्त्र धोरण जाहिर केले.

पंतप्रधान मनमोहन सिंगाच्या काळात भारत-अमेरिका संबंध विकसित करण्यासोबतच अर्थव्यवस्था दृढ करण्याबरोबरच सर्वच समस्या सोडविण्याबाबत प्रयत्न केले, चीन-पाक सोबत संबंध सुधारण्याचे प्रयत्न झाले. मनमोहन सिंगच्या दुस-या कालखंडात मात्र विदेशनिती बाबत उतरती कळा लागली याला कारणीभूत भारत अमेरिका संबंधात तणाव वाढले. शेजारी राष्ट्रांकडे दूर्लक्ष झाले यांचा फायदा चीनला झाला.

पंतप्रधान नरेंद्र मोदींनी भारताला जागतिक स्तरावर समृध्द बनविण्याकरीता विदेश दौरे केले व भारताची शेजारी राष्ट्रे, सार्क देश, आशीयान देशासोबत संबंध सुदृढ करण्यावर भर दिला. डोकलाम समस्या शांतीपूर्ण मार्गाने सोडविण्याचा प्रयत्न केला. या काळात सुध्दा आर्थिक विकासाला प्राधान्य दिल्या जात आहे. आतंकवादी समस्या जागतिक स्तरावरून सोडविण्याचा प्रयत्न केला. परकिय गुंतवणूकीला आकिर्षित करण्याकरीता निर्मीती क्षेत्रात वाढ करण्यावर भर दिला त्याकरीता मेक इन इंडिया प्रोजेक्टर हाती घेतल्या. भारतात गुंतवणूक करणा-यांना विज, जमीन पर्यावरणसंबंधी ना-हरकत प्रमाणपत्र 72 तासात दिले जातील असे आश्वासन दिले. परंतु हे करतांना भारताच्या सुरक्षिततेच बळी दिल्या जाणार नाही हेही स्पष्ट केले अमेरिकेसोबत संबंधक सुधारण्यावर भर असला तरी अमेरिकेची प्रत्येक गोष्ट भारत स्विकारणार नाही हेही स्पष्ट केले.

परराष्ट्र धोरणापुढील आव्हाने

प्राचीन काळातील वैभव व नावलौकीक मध्ययुगीन काळातील सततच्या बाह्य आक्रमणामुळे लयास गेले. अर्थव्यवस्था खिळखिळी झाली, आशिया खंडात चीनप्रमाणे वर्चस्व भारताला निर्माण करता आले नाही. त्यामुळे भारतीय परराष्ट्र धोरणावर विपरित परिणाम होवून काही आव्हाने निर्माण झाली.

१. **अलीप्तवादी चळवळीचे अपयशः** भारताने सुरूवातीच अलिप्ततावादी राजकारणात महत्वाची भूमिका पार पाडली. नंतरच्या सोव्हिएट रशियाच्या विघटनांनंतर आंतरराष्ट्रीय राजकारणाला

मोठी कलाटणी मिळाली व तीचे महत्व कमी झाले त्याचा परिणाम भारताच्या परराष्ट्र धोरणांवर झाला.

२. **भारत-पाक संबंधः** भारत **स्वातंत्र्य** झाल्यापासून भारत-पाक संबंध तणावाचे राहीले आहेत यात निर्वासितांची समस्या, पाणी वाटप, काश्मिर समस्या, भारत पाक युध्द, कारगिल युध्द, दहशतवादी कृत्य यामुळे सतत तणावाची स्थिती असल्यामुळे विदेश नीतीवर विपरित परिणाम निर्माण झाले.

३. **भारत-चीन संबंधः** आशिया खंडात भारतापेक्षा चीनचे वर्चस्व निर्माण केले. 1962 च्या युध्दात भारताची नाचक्की झाली. पंचशील तत्वे मान्य करूनही अवहेलना केली. छुप्या मार्गाने व पाकीस्तानच्या मदतीने सतत छुप्या मार्गाने कारवाया सुरूच आहेत. याचा भारतीय परराष्ट्र धोरणावर परिणाम झाला आहे.

४. **भारत-बांग्लादेश तणावः** बांगलादेशाला भारताने **स्वातंत्र्य** मिळवून दिले त्याची परतफेड त्याने विरोधी कारवाया करून दिली यामध्ये अवैध व्यापा-याला उत्तेजन, इशान्य भारतात अशांतता निर्माण करणे, दहशतवादाला प्रोत्साहन देणे, घुसखोरी यामुळे तणाव निर्माण होत आहे.

५. **शांतता व आदर्शवादः** शांतता व आदर्शवादाला भारताने महत्व दिले आहे, परंतु आंतरराष्ट्रीय राजकारणात याला महत्व नाही त्यामुळे शेजारी राष्ट्रांची घुसखोरी व दहशतवादी कृत्ये करण्यास प्रोत्साहनच मिळाले.

६. **वाढता दहशतवादः** अहिंसा आणि सहनशिलता हे भारतीय परराष्ट्र धोरणाचे तत्व आहे. त्यामुळे दहशतवादाचे गंभीर परिणाम भारताला भोगावे लागत आहेत. आंतरराष्ट्रीय स्तरावर मदत आणि सहानुभूती भारताच्या बाजुने राहत नाही याचे विपरित परिणाम देशाला भोगावे लागत आहेत.

७. **युनोतील बदलते राजकारणः** संयुक्त राष्ट्र संघटनेची स्थापना शांतता व सुरक्षितता या मुद्यांवर झाली आहे. युनो सतत अमेरिकेच्या बाजुने उभी असणे त्याचा परिणाम भारतावर झाला आहे.

## निष्कर्ष

भारताच्या परराष्ट्र धोरणातील असंलग्नतेचे धोरण हे भारताकरीता योग्य होते यामुळे दोन्ही गटांकडून मदत घेवून भारताचा विकास होण्यास मदत झाली. आदर्शवादी विचारसरणी व राजकारणाचा अनुभव यामुळे दोष निर्माण झाले. चीनच्या बाबतीत धोरण चुकले तरी तत्वे भारताच्या हिताची होती, हे अमान्य करून चाललं नाही. आजपर्यंत भारताच्या परराष्ट्र धोरणाची तत्वे काही फरकाने प्रत्येक कालखंडात स्विकारल्या गेली. त्यातून भारताची स्थिती आज जागतिक स्तरावर उंचावण्यास मदत झाली हे नाकारून चालणार नाही. कालमानपरत्वे थोडेफार बदल करणे हे अपरिहार्य असले तरी भारताचे परराष्ट्र धोरण भारताचा विकास करण्यास समर्थ आहे, असे म्हणने चुकीचे ठरणार नाही.

### संदर्भ सुची

१. डॉ. बी. पी. अस्थाना व डॉय बी.बी. सिंह, विश्व के प्रमुख देशों की विदेश नितीया, तुलशी प्रकाशन, मेरठ-1987

२. प्रा. श्री गो. काशीकर, आंतरराष्ट्रीय संबंध, महाराष्ट्र वियापिठ ग्रंथ निर्मिती मंडळ, नागपुर, 1983.

३. प्रा. वसंत र. रायपुरकर, आंतराष्ट्रीय संबंध, श्री मंगेश प्रकाशन, नागपुर 1978.

४. डॉ. पंडीत शेषराव नलावडे, आंतरराष्ट्रीय संबंध, कैलास पब्लीकेशन, औरंगाबाद, 2014

५. डॉ. बी.आर. जोशी, राज्यशास्त्र, डायमंड पब्लीकेशन, पुणे, 2007

६. http://mdudde.net

७. http://mea.gov.in